## विशेष दिवाणी दावा क्र. ४९/२०१४ मध्ये निशाणी क्र. ६९ कडील अर्जावर आदेश.

१) वादीने प्रस्तुतचा अर्ज दैनिक पुढारी, सातारा तर्फे संपादक किंवा माहितगार इसम यांना साक्षी समन्स काढण्याकरीता दाखल केला आहे.

२) प्रतिवादींतर्फे प्रस्तुत अर्जावर दिलेल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, केवळ दाव्याचे काम लांबविण्याच्या दृष्टीने हा अर्ज दाखल केला आहे व त्यामुळे अर्ज नामंजुर करावा.

३) प्रस्तुत अर्जाच्या कामी दोन्ही पक्षातील विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसुन येते की, वादीने यापुर्वी दैनिक पुढारी, सातारा तर्फे संपादक किंवा माहितगार इसम यांना साक्षी समन्स काढण्याबाबत निशाणी क्र. ६७ कडे अर्ज दाखल केला आहे व त्या अर्जावर सदर अर्जातील नमुद साक्षीदाराला साक्षी समन्स काढण्याबाबत आदेश दिनांक १५/०९/२०२३ रोजी आदेश पारीत झाला आहे. दाव्याचे स्वरुप विचारात घेता व निशाणी क्र. ६७ कडील अर्ज व त्यावरील आदेश विचारात घेता माझ्या मते वादीने या अर्जामध्ये दैनिक पुढारी, सातारा तर्फे संपादक किंवा माहितगार इसम यांना पुन्हा साक्षी समन्स काढण्याबाबत केलेली विनंती मंजुर होण्यास पात्र आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१) वादीने नियमानुसारचा साक्षी भत्ता जमा केल्यावर निशाणी क्र. ६७ कडील अर्जावरील आदेशाप्रमाणे दैनिक पुढारी, सातारा तर्फे संपादक किंवा माहितगार इसम यांना पुन्हा साक्षी समन्स काढण्यात यावे.

२) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2024.10.15 17:24:12 +0530

दिनांकः– १५/१०/२०२४ (पां. लिं. घुले)

ठिकाणः– कराड. २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.